**अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**

**दि.०६.०४.२०२३**

# प्रेस नोट

आलोसे क्रं. १)प्रमोद प्रल्हाद न्हायदे, वय ४५,तलाठी सजा खिरोदा प्र.यावल ता.रावेर जि.जळगांव रा.फैजपुर ता.रावेर जि.जळगांव व शांताराम यादव कोळी, वय ५२,कोतवाल खिरोदा प्र.यावल ता.रावेर जि.जळगांव रा.खिरोदा प्र.यावल ता.रावेर जि.जळगांव यांनी तक्रारार यांना ४०००/–रुपयांची मागणी करुन सदर लाच रक्कम आलोसे क्रं.१ यांनी आलोसे क्रं.२ यांच्या उपस्थितीत स्वत: स्वीकारली म्हणुन गुन्हा.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | घटक | :– | जळगांव. |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | :– | सावदा पो.स्टे. गु.र.नं.६९/२०२३ |
| ३ | कलम | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे. |
| ४ | आरोपीचे नांव व कार्यालय | :– | १)प्रमोद प्रल्हाद न्हायदे, वय ४५, तलाठी सजा खिरोदा प्र.यावल, ता.रावेर जि.जळगांव ह.मु.शिव कॉलनी, विठ्ठल मंदिराचे मागे, फैजपुर रा. धनगर वाडा, वर्डी ता.चोपडा जि.जळगांव **(महसुल विभाग वर्ग ३)**<br>२) शांताराम यादव कोळी, वय ५२, कोतवाल खिरोदा प्र.यावल ता.रावेर जि. जळगांव रा.खिरोदा प्र.यावल ता.रावेर जि.जळगांव **(महसुल विभाग वर्ग ४)** |
| ५ | मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम | :– | दि.०६/०४/२०२३ रोजी<br>४,०००/–रु. लाचेची मागणी केली आहे. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | ४,०००/– रुपये. |
| ७ | गुन्हा दाखल तारीख | :– | दि.०६/०४/२०२३ |
| ८ | थोडक्यात माहीती | :– | यातील फिर्यादी यांची खिरोदा गावामध्ये गट नं.३०६/२/२ मध्ये वडीलोपार्जित १ हे.३५ आर.ऐवढी शेत जमीन आहे. फिर्यादी यांची आई व भाऊ हे मयत झाल्याने त्यांचे नाव सदर शेत जमीनवरुन कमी करण्यात आले नव्हते.फिर्यादी व त्यांची वहीणी सुनिता महाजन यांना सदर शेत जमीनीची वाटणी करणी असल्याने त्यांनी शेतजमीनीच्या ७/१२ उतार्‍यावरील नाव कमी करावयाचे असल्याने फिर्यादी यांनी दि.२२.०२.२०२३ रोजी त्यांचे नावाने ७/१२ उतार्‍यावरील त्यांची आईचे नाव कमी होण्यासाठी व फिर्यादीची वहीणी सुनिता महाजन हिचे मयत पती विष्णु महाजन यांचे नाव कमी होवुन वारस नोंद म्हणुन त्यांचे नाव सुनिता महाजन व त्यांचा मुलगा उज्वल महाजन यांचे ७/१२ उतार्‍यावर नाव लावणेसाठी लेखी अर्ज तलाठी कार्यालय खिरोदा प्र.यावल येथील तलाठी प्रमोद न्हायदे यांचे कडे दिला. त्यावेळेस त्यांनी सदरचा अर्ज चेक करुन तुमच्या अर्जावर पुढील कारवाई करतो असे सांगुन सदरचे दोन्ही अर्ज कोतवाल शांताराम कोळी यांचे कडेस देण्यास सांगितले.त्याप्रमाणे फिर्यादी यांनी सदरचे दोन्ही अर्ज कोतवाल शांताराम कोळी यांचे कडेस दिले होते.<br>त्यानंतर दि.०३.०४.२०२३ रोजी फिर्यादी यांनी तलाठी कार्यालयात जावुन तलाठी प्रमोद न्हायदे व कोतवाल शांताराम कोळी यांची भेट घेवुन त्यांना त्यांच्या ७/१२ उतार्‍यावरील नोंदीच्या प्रकाणांचे काय झाले बाबत विचारले असता तलाठी प्रमोद न्हायदे यांनी फिर्यादी कडे ४,०००/–रु. लाच रक्कमेची केली.त्यावर कोतवाल शांताराम कोळी यांनी सुध्दा ४,०००/–रु. लाचेची मागणी केली.त्याबाबत फिर्यादी यांनी दि.०६.०४.२०२३ रोजी ला.प्र.वि.जळगांव येथे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची ला.प्र.वि.जळगाव पथकाने दोन पंचासमक्ष दि.०६.०४.२०२३ रोजी पडताळणी केली असता दोन्ही आलोसे यांनी फिर्यादी यांचे आईचे नाव ७/१२ उतार्‍यावरुन कमी होण्यासाठी व फिर्यादी यांची वहीणी व मुलगा यांचे वारस म्हणुन ७/१२ उतार्‍यावर नाव लावणेसाठी ४,०००/–रुपये रक्कमेची मागणी करुन सदर लाच रक्कम आलोसे क्र.०१ यांनी स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in

**टोल फ्री क्रमाक:–** 1064,दुरध्वनी **क्रमाक:–**0257-2235477

**व्हॉटसअॅप क्रमाक:–** 8766412529

06.04.2023

शशिकांत श्रीराम पाटील
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव